प्रेसनोट तारीख ०५.०८.२०१९

# मार्केटयार्ड पोलीस स्टेशन

## बिबवेवाडी पो.स्टे कडील दाखल गुन्हयातील पाहिजे आरोपीस मार्केटयार्ड पोलीसांकडुन अटक

मार्केटयार्ड पो.स्टे.हद्दीत आज दि.०५/०८/२०१९ रोजी नेहमी प्रमाणे मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो। याचे दिमतीत सहा.पोलीस निरीक्षक पी.ए.खटके व सर्वेलन्स पथकातील कर्मचारी पो.ना.६५१२ वारुळे, पो.ना.२९२० धोत्रे, पोशि ८७७४ काटकर असे मिळुन पेट्रोलीग करीत असताना पोना ६५१२ वारुळे यांचे गुप्तबातमीदारा मार्फत एक संशयीत इसम हा मार्केटयार्ड भाजी मंडई जवळील पेट्रोलपंपाजवळ संशयीत रित्या थांबले असल्याचे सांगीतले असता, मिळालेल्या बातमी प्रमाणे त्यांनी सदर ठिकाणी जाऊन खात्री केली असता सदर वर्णनाचा इसम हा मार्केटयार्ड भाजी मंडई जवळील गेट क्र. ५ जवळील पेट्रोलपंपाजवळ संशयीतरित्या उभा असल्याचे दिसले. सदर संशयीत इसमास शिताफीने ताब्यात घेऊन त्यास मार्केटयार्ड पोलीस ठाणे पुणे येथे आणुन त्याच्याकडे अधिक चौकशी करता त्याने त्याचे नाव अनिकेत ऊर्फ गोटया अरुण चांदणे वय २७ वर्षे रा.कोंढवा पुणे असे असल्याचे सांगीतले. आम्ही त्याचे बाबत अधिक माहिती घेतली असता, सदर संशयीत इसम हा बिबवेवाडी पो.स्टे. कडील गु.र.नं. १९४/२०१८ भादविक ३९४,३३६,४२७,५०४,३४ मधील पाहिजे आरोपी असल्याचे निष्पन्न झाल्यानें त्यास आज रोजी ताब्यात घेऊन सदर आरोपीस बिबवेवाडी पो.स्टे. यांचे ताब्यात देऊन बिबवेवाडी पोलीस स्टेशन पुढील कारवाई करत आहेत.

सदरची कारवाई ही पोलीस उप आयुक्त झोन ५ श्री.सुहास बावचे साहेब, सहा.पोलीस आयुक्त श्री.सुनील कलगुटकर वानवडी विभाग, वरिष्ठ पोलीस निरीक्षक मार्केटयार्ड पोलीस ठाणे श्री संभाजी निंबाळकर यांचे मार्गदर्शना खाली करण्यात आलेली आहे.